**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२**
**क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य**
**नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो- २०१९/प्र.क्र.९४/क्रीयुसे-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १८ जुलै, २०१९

**वाचा -**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२०१२/ प्र.क्र. २६०/ क्रीयुसे-१, दिनांक १ मार्च, २०१४.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२०१८/ प्र.क्र. १५७/ क्रीयुसे-१, दिनांक ८ मार्च, २०१९.
३) शासन शुद्धिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो- २०१९ /प्र.क्र.९४/क्रीयुसे-१, दिनांक २८ मे, २०१९

**प्रस्तावना:-**

राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाच्या दर्जा सुधारणा, दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध होण्याकरीता राज्य क्रीडा धोरण-२०१२ अंतर्गत, राज्यातील खाजगी/शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या व राज्य शासनाच्या संबंधीत विभागांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्था, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीबद्ध अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना इत्यादींना क्रीडा सुविधा निर्मितीस व क्रीडा साहीत्यासाठी अनुदान देण्याबाबत संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार, क्रिडा सुविधा अनुदान वितरणासाठी पात्र संस्थांच्या यादीत नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांचा समावेश करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राज्य क्रीडा धोरण-२०१२ नुसार राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था या मधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणेकरीता तसेच खेळाडूंच्या कामगिरीत वाढ होऊन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू निर्माण होण्याच्या अनुषंगाने, ग्रामीण तसेच आदिवासी भागातील खेळाडूंच्या व सामान्य नागरिकांच्या शारिरीक तंदुरुस्तीसाठी क्रीडा साहीत्य उपलब्ध व्हावे, याकरीता, दिनांक १ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये क्रीडा सुविधा निर्मितीकरीता अटी/ शर्ती घालण्यात आल्या आहेत.

**सदर शासन निर्णयातील अ.क्र. ३) अनुदानासाठी पात्र संस्था या यादीत अ.क्र. ७ वर खालील संस्थांचा समाविष्ट करण्यात येत आहे**

**७) नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था**

या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना सोबतच्या प्रपत्र-क प्रमाणे क्रीडा साहित्य देय राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७१८१४४६३५२०२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.07.18 15:03:36 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
४) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद यांचे सचिव.
६) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) सर्व विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा.
८) सर्व विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद.
९) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१३) सर्व विभागीयआयुक्त (महसूल)
१४) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल समिती (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)
१५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.

१६) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)

१७) सर्व जिल्हा / तालुका क्रीडा अधिकारी (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)

१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/ २, मुंबई/ नागपूर.

१९) महालेखापाल (लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र १/ २, मुंबई/ नागपूर.

२०) ग्रंथपाल, विधीमंडळ

२१) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.

२२) अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे -३)

२३) निवडनस्ती, क्रीयुसे-१.

शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२०१९/ प्र.क्र. ९४/ क्रियुसे-१, दिनांक १८ जुलै, २०१९ चे सहपत्र.

## प्रपत्र-क

## नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना क्रीडा साहित्य पुरवठाबाबत मर्यादा

(रुपये हजारात)

| अ.क्र. | क्रीडा प्रकार | साहित्य | अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | फुटबॉल | ५ नग, ग्लोव्हज, गोलपोस्ट | १५.०० |
| २ | बॅडमिंटन | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन पोल, रॅकेट, शटल कॉक (प्लॅस्टिक) | १५.०० |
| ३ | हॉलिबॉल | ५ नग, नेट, पोल | १२.०० |
| ४ | बास्केट बॉल | ५ नग, नेट, पोल | १२.०० |
| ५ | ओपन जीम | सिंगल बार, डबल बार, ट्विस्टर, शोल्डर बिल्डर | ५०.०० |
| ६ | क्रीकेट | बॅट -४ नग, ग्लोव्हज, स्टंप- ६ नग, टेनिस बॉल- १ डझन | १५.०० |
| ७ | सायकल | Excer Cycle/ Cycle | ०५.०० |
| ८ | योगा | मॅट- १५ ते २० मॅट | १०.०० |